POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२२८ ● मुंबई, रविवार, २२ मार्च २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

**खोटी लिंक कशी ओळखाल?**

सायबर गुन्हेगार सरकारी वेबसाईटसारख्या हुबेहूब लिंक तयार करतात. त्यामुळे लिंकवर क्लिककरण्याआधी ती बारकाईने तपासा.

- अधिकृत वेबाईटच्या शेवटी सहजा .in किंवा .gov.in असते.
- खोट्या लिंक्समध्ये mylpg-gas.org, free-gas-booking.com यांसारखे बारीक बदल असू शकतात.
- लिंकच्या सुरुवातीला https:// असते. जर लिंकमध्ये याऐवजी http:// असे असेल तर ती खोटी लिंक आहे.
- तसेच कोणत्याही मोफत आणि सुट देणाऱ्या लिंकवर क्लिक करणे टाळा. तसेच एखादी पीडीएफ किंवा अनोळखी अॅप डाउनलोड करण्यास सांगितले तर तो एक स्कॅम असू शकतो.

## दुष्काळात 13 वा महिना... गॅस तर मिळाला नाहीच 1.15 लाख रुपये मात्र गमावले

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

ऐन गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर ठाण्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. एका ठाणेकराने चक्क 1 लाख 15 हजार रुपयांचे गॅस बील भरले आहे. बोगस लिंक आणि डिजिटल स्कॅमच्या जाळ्यात आल्यामुळे हा प्रकार घडला आहे. गॅस टंचाईचा सर्वाधिक परिणाम सामान्यांच्या खिशावर झाला आहे. आधीच महागाई त्यात दररोजच्या वापरासाठी आवश्यक असलेल्या एलपीजी गॅसची दरवाढ, तसेच टंचाईमुळे राज्यात अनेक जिल्ह्यात लोक तासन् तास रांगा लावत सिलिंडर खरेदीसाठी उभे राहत आहेत या सगळ्यामध्ये सामान्य होरपळून जात असतानाच ही बातमी समोर आली आहे.

**गॅस बुकींग ऑफिसमधून बोलतोय सांगून लाखोंचा गंडा**

दरम्यान, आजच्या आधुनिक काळात कोणालाही डिजिटल स्कॅमच्या जाळ्यात अडकवणे हे कोणत्याही हॅकरसाठी अगदी सोपे झाले आहे. व्हॉट्सअॅप लिंक किंवा एसएमएसवर लिंक पाठवून डिजिटल पद्धतीने लोकांच्या बँक अकाउंटवर डल्ला मारला जातो. आरटीओ बील, लाइट बील किंवा इतर महत्त्वाच्या पीडीएफ किंवा लिंक पाठवून फसवणूक करण्याच्या अनेक बातम्या समोर येत आहेत. अशात एका ठाणेकरासोबतही अशीच एक घटना घडली




आहे. गॅस बुकींगच्या ऑफिसमधून बोलतोय असे सांगून, त्याला बील भरण्यासाठी लिंक पाठवली गेली. लिंकवर क्लिक करताच क्षणातच तब्बल 1 लाख 15 हजार रुपये खात्यातून गायब झाले.

**लिंकवर क्लिक करताच क्षणातच खाते रिकामे**

मिळालेल्या माहितीनुसार, या फसवणुकीला बळी पडलेल्या व्यक्तिचे नाव देवनारायण शर्मा असून ते एक रिक्षाचालक आहे. त्यांना 9752610603 या मोबाइल क्रमांकावरून एक व्हॉट्सअॅवर गॅस बुकींग आणि बील भरण्यासाठीचा मॅसेज लिंकसह पाठवण्यात आला. ज्यावर क्लिक करताच क्षणातच खाते रिकामे झाले. दरम्यान, याबाबत आरोपीवर ठाण्यातील नौपाडा पोलिस स्थानकात तक्रार करण्यात आली असून, पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच याच आरोपीने याआधीही ठाण्यात अनेकांना गंडा घातल्याचा पोलिसांना संशय आहे.

**तुमच्या सोबत अशी फसवणूक होण्यापासून रोखण्यासाठी काय कराल?**

अशा फसवणुकीपासून वाचण्यासाठी जर तुमच्याही सोबत असे झाले तर काय कराल? याची प्रत्येकाला माहिती असणे आवश्यक आहे.यासाठी सर्वप्रथम तुम्हाला आलेली लिंक भारतातील मुख्य गॅस कंपन्यांच्या अधिकृत वेबसाईटची आहे का हे तपासा.

**सर्व कंपन्यांची अधिकृत लिंक**

- HP Gas: https://myhpgas.in
- Bharat Gas: https://my.ebharatgas.com
- Indane (Indian Oil): https://cx.indianoil.in




## आरटीईचे तीन हजार कोटींचे अनुदान अजूनही थकितच

■**मुंबई। प्रतिनिधी,**

केंद्र सरकारच्या शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) आर्थिक आणि सामाजिक दुर्बल विद्यार्थ्यांसाठी शाळांमध्ये २५ टक्के जागा राखीव ठेवाव्या लागतात. या कायद्यानुसार राज्यात ८ हजार ८४३ शाळांमध्ये ४ लाख ९८ हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून या विद्यार्थ्यांसाठी शाळांना दिले जाणारे २ हजार ९३० कोटी रुपये सरकारने थकवले असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात असला तरी संबंधित शाळांना सरकारकडून दिले जाणारे तीन हजार कोटींचे अनुदान थकले आहे. यामुळे महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टीज (मेस्टा) संस्थापकांनी नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश न देण्याचा इशारा दिला असल्याची बाब राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या अमोल मिटकरी यांनी विधान परिषदेत लक्षवेधीद्वारे सरकारच्या निदर्शनास आणली. यावर उत्तर देताना शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी थकलेले अनुदान लवकरात लवकर देण्यासाठी सरकार प्रयत्न करेल असे आश्वासन दिले. आरटीई अंतर्गत राज्याने ४० टक्के तर केंद्र सरकारकडून ६० टक्के निधी दिला जातो.

## तब्बल 261 कोटींचं महाबजेट

### आणखी चार मिसिंग लिंक बदलणार महाराष्ट्रातील रस्ते प्रवासाचं चित्र

■**मुंबई। प्रतिनिधी,**

रस्ते प्रवासाचा वापर भारतासह महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात होत असून, रस्तेमार्गांनी राज्यातील जवळपास सर्वच भाग जोडले गेल्यामुळं या मागार्ने मोठ्या प्रमाणात प्रवास केला जातो. दळवळणाचं महत्त्वाचं माध्यम म्हणूनही या रस्त्याकडे पाहिलं जातं. अशा स्थितीत गेल्या काही वर्षांमध्ये वाढलेली वाहनांची संख्या पाहता वाहनचालक आणि सामान्य प्रवाशांना विविध भागांमध्ये सातत्यानं वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. महामार्ग असो किंवा शहरातील पूल आणि चिंचोळे रस्ते, वाहतूक कोंडीतून वाट काढताना वाहनचालकांची चांगलीच दमछाक होत आहे.




अशाच एका अतिशय दाटीवाटीच्या आणि प्रचंड गर्दीच्या रस्त्यावरील वाहतूक कोंडी लक्षात घेचा त्यावर तोडगा म्हणून एक नव्हे तर, तब्बल 4 मिसिंग लिंक विकसिक करण्याचा मानस पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ठेवत त्या दृष्टीकोनातून कामंही सुरू केली आहेत. तब्बल 261 कोटींचा खर्च या प्रकल्पांसाठी केला जाणार असून, त्याचा फायदा असंख्य नागरिकांना मिळणार असल्याचं म्हटलं जात आहे.

सकाळच्या आणि संध्याकाळच्या वेळेत चाकण चौकातील वाहतूक कोंडीमध्ये प्रवाशांचा तास- दीड तास वाया जातो. अनेकदा या वाहतूक कोंडीमध्ये एमआयडीसीतील कामगारांना अडकून पडावं लागतं. आता मात्र त्यांच्याकडे पर्यायी मार्गाची उपलब्धता असेल ज्यामुळं इंधन आणि वेळेचीसुद्धा बचत होणार आहे. भूसंपादन प्रक्रियेनंतर साधारण वर्षभरात हे मिसिंग लिंक पूर्ण करण्यावर प्रशासनाचा भर असेल असं सांगण्यात येत आहे.

**कुठे असतील हे मिसिंग लिंक?**

पुणे नाशिक महामार्गावर चाकणपाशी होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता मिसिंग लिंकसाठी प्राधिकरण कामाला लागलं आहे. राहिला मुद्दा हे मिसिंग लिंक नेमके कुठे असतील, तर...

- चाकणच्या तळेगाव चौक, आंबेठाणसह आळंदी फाटा चौकातील गर्दी कमी करण्यात या मिसिंग लिंकची महत्त्वाची भूमिका असेल.
- हिंगणे चौक ते फोक्सवॅगन कंपनी (खराबवाडी) इथं 900 मीटरक लांबीचा हा रस्ता एमआयडीसी फेज 3 ला जोडला जाईल.
- नाणेकरवाडी ते समृद्धी सीएनजी पंप इथं 1.2 किमीता रस्ता थेट राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 60 ला जोडला जाईल.
- मेदनकरवाडी ते रासे फाटा 2.5 किमीचा रस्ता तळेगाव- चाकण महामागार्ला जोडेल. तर, वेस्टर्न बायपास हा चाकण एमआयडीसी फेज 5 ते जुन्या मुंबई पुणे महामागार्ला जोडणारा 60 मीटरचा रुंद मार्ग असेल.

## ‘प्रारंभ 2026’ मोहीम लॉन्च, 1 एप्रिल 2026 पासून करव्यवस्था बदलणार...

■**मुंबई। प्रतिनिधी,**

1 एप्रिल 2026 पासून लागू होणाऱ्या नवीन प्राप्तिकर कायद्यापूर्वी सरकारने ‘प्रारंभ 2026’ मोहीम सुरू केली आहे. या अंतर्गत, नियम सोप्या भाषेत समजावून सांगितले जातील आणि एक नवीन ई-फाईलिंग पोर्टलही सुरू केले गेले आहे. कर प्रणाली सोपी, डिजिटल आणि विश्वासार्ह बनवणे हा यामागचा उद्देश आहे.

भारतातील कर प्रणालीत मोठा बदल होणार आहे आणि त्याची तयारी आतापासूनच सुरू झाली आहे. 1 एप्रिल 2026 पासून लागू होणाऱ्या नवीन प्राप्तिकर कायद्याबाबत केंद्र सरकारने देशभरात जनजागृती मोहीम सुरू केली आहे.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी प्रारंभ 2026 नावाची एक विशेष मोहीम सुरू केली आहे, ज्याचा उद्देश नवीन कायदा सामान्य लोकांपर्यंत सोप्या आणि समजण्यायोग्य भाषेत पोहोचवणे हा आहे. यासोबतच प्राप्तिकर विभागाने ‘आयकर वेबसाइट 2.0’ हे नवीन ई-फाइलिंग पोर्टल देखील सुरू केले आहे, ज्यामुळे कर भरणे पूर्वीपेक्षा सोपे होईल. कोट्यवधी पगारदार, छोटे व्यापारी आणि व्यावसायिकांच्या कर पद्धतीत हा मोठा बदल घडवून आणणार आहे.

काय आहे ‘प्रारंभ 2026’ अभियान? दिल्लीत आयोजित एका कार्यक्रमात अर्थमंत्र्यांनी या मोहिमेचा शुभारंभ केला. ‘प्रारंभ 2026’ ही राष्ट्रीय स्तरावरील जनसंपर्क मोहीम आहे ज्याद्वारे नवीन प्राप्तिकर कायदा 2025 सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवला जाईल.

कायदा लागू होण्यापूर्वी




लोकांना पूर्ण वर्षाचा कालावधी देणे हे सरकारचे ध्येय आहे, जेणेकरून ते नवीन नियम चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतील आणि कोणताही गोंधळ न करता कर भरू शकतील.

प्रिंट, टीव्ही, रेडिओ, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडियाद्वारे ही मोहीम राबविली जाईल. तसेच, मार्गदर्शन नोट्स, व्हिडिओ ट्यूटोरियल्स, माहितीपत्रके आणि वारंवार विचारले जाणारे प्रश्न देखील अनेक भाषांमध्ये उपलब्ध करुन दिले जातील.

**नवीन कर कायदा :** काय वेगळे असेल? प्राप्तिकर कायदा 2025 म्हणजे केवळ एक दुरुस्ती नसून एक पूर्णपणे नवीन आणि सोपा कायदा आहे. महसूल सचिव अरविंद श्रीवास्तव यांनी सांगितले की, कर प्रणाली अधिक वापरकर्ता-अनुकूल करण्यासाठी हा बदल करण्यात आला आहे. नियम, फॉर्म आणि कार्यपद्धती अशा प्रकारे डिझाइन केल्या आहेत की कमी विवाद असतील आणि लोकांना समजणे सोपे होईल.

त्याच वेळी, अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी यावर जोर दिला की कर भरण्याची प्रक्रिया सुलभ करण्यावर सरकारचे लक्ष आहे, जेणेकरून लोक भीती किंवा गोंधळाऐवजी आत्मविश्वासाने कर भरतील.

**प्रारंभ 2026 :** तळागाळापर्यंत पोहोचणे सीबीडीटीचे अध्यक्ष रवी अग्रवाल म्हणाले की, ‘प्रारंभ’ म्हणजे धोरण सुधारणा आणि मिशन विकसित भारतसाठी जबाबदार कृती. हे अभियान “नागरिक देवो भव” म्हणजेच करदाता सर्वोच्च मानला जाईल या विचारावर आधारित आहे.

देशभरात 300 हून अधिक कार्यशाळा आयोजित केल्या जातील, ज्यात लोकांना थेट माहिती दिली जाईल. याशिवाय MyGov प्रश्नमंजुषा सारखे संवादात्मक कार्यक्रमही असतील, जेणेकरून लोक सहजपणे जोडले जाऊ शकतील. ही माहिती केवळ मोठ्या शहरांपुरती मर्यादित राहू नये, तर लहान शहरे आणि वस्तींपर्यंत पोहोचावी असा सरकारचा प्रयत्न आहे. जेणेकरून प्रत्येक करदात्याला समान माहिती मिळू शकेल.

## ईदचं नमाज पठण सुरु होतं

### दुचाकीसह तरुण जिवंत जळाला, वाजेगाव बंधाऱ्यावर काय घडलं

**एटीएसकडून तपास सुरू**



■**नांदेड। प्रतिनिधी,**

नांदेड शहराजवळ असलेल्या वाजेगाव बंधाऱ्यावर आज सकाळी एक अंगावर शहारे आणणारी घटना घडली. एका व्यक्तीचा आपल्या दुचाकीसह जळून अत्यंत भीषण मृत्यू झाला आहे. या घटनेवेळी झालेल्या गूढ स्फोटांमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, प्रकरणाचे गांभीर्य ओळखून एटीएस आणि फॉरेन्सिक लॅबने तपासाची सूत्रे हाती घेतली आहेत.

**नेमकी घटना काय?**

सकाळी ईदनिमित्त शहरातील मुख्य ईदगाह मैदानावर अनेक मुस्लीम बांधव नमाजसाठी जमले होते. या ठिकाणापासून काही अंतरावरच असलेल्या वाजेगाव बंधारा परिसरात ९:३० च्या सुमारास एक दुचाकीस्वार अचानक आगीच्या भडक्यात अडकला. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, ती व्यक्ती आणि दुचाकी जळत असताना अंगातून आणि गाडीतून मोठ्या स्फोटांचे आवाज येत होते. हे स्फोट नेमके कशाचे होते, याबाबत अद्याप संभ्रम आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी धाव घेतली, मात्र उपचारापूर्वीच त्या व्यक्तीचा मृत्यू झाला होता.

**एटीएस आणि फॉरेन्सिक कडून कसून तपास**

या घटनेत घातपाताचा संशय व्यक्त केला जात आहे. घटनास्थळी पोलिसांना काही संशयास्पद साहित्य मिळाले असून ते तातडीने फॉरेन्सिक तपासासाठी पाठवण्यात आले आहे. राज्य दहशतवाद विरोधी पथक देखील या प्रकरणाचा समांतर तपास करत आहे. तो व्यक्ती कोणत्या संघटनेचा होता का? त्याचा हेतू काय होता? आणि स्फोटके असतील तर ती कोठून आली? या सर्व अँगलने तपास सुरू असल्याचे अप्पर पोलीस अधीक्षक सूरज गुरव यांनी सांगितले.

**मृताची ओळख पटली**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत व्यक्तीची ओळख पटली आहे. मात्र, तपासाच्या गोपनीयतेसाठी सध्या नाव जाहीर करण्यात आलेले नाही. मिळालेल्या प्राथमिक माहितीच्या आधारे पोलिसांची विविध पथके तपासासाठी रवाना झाली आहेत. घटनास्थळावरील पुराव्यांवरून काही ठोस निष्कर्ष हाती लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

**अफवांवर विश्वास ठेवू नका, पोलीस प्रशासनाचे आवाहन**

या घटनेनंतर शहरात विविध चर्चांना उधाण आले आहे. "काही लोक जाणीवपूर्वक सोशल मीडियावरून अफवा पसरवत आहेत. नागरिकांनी कोणत्याही चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवू नये. तपासातून जो काही निष्कर्ष निघेल, तो अधिकृतपणे समोर आणला जाईल," असे आवाहन सूरज गुरव यांनी केले आहे. सध्या संपूर्ण नांदेड जिल्ह्याचे लक्ष या तपासाकडे लागले असून, या भीषण मृत्यूमागचे गूढ कधी उकलणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**4 वाहने एकमेकांवर आदळली**

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर 4 वाहनाचा भीषण अपघात झाला. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर वसईतील ससुपाडा परिसरात आज दुपारच्या सुमारास हा भीषण अपघात झाला. या अपघातात कंटेनर, दोन कार आणि एक टेम्पो अशी एकूण चार वाहने एकमेकांवर आदळल्याची माहिती समोर आली आहे. अपघातानंतर काही काळ महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. या घटनेमुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून, मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले. तसेच पोलीस घटनास्थळी दाखल होत वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

## हृदयद्रावक... मुंबई-अहमदाबाद हायवेवर भीषण अपघात

### दुचाकीवरील तिघे ठार, अज्ञात वाहनासह चालक फरार



■**पालघर। प्रतिनिधी,**

जिल्ह्यातील मुंबई-अहमदाबाद महामार्गावर दिवसभरात अपघाताच्या दोन घटना घडल्या आहेत. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील ढेकाळे येथील वाघोबा खिंड परिसरात भीषण अपघाताची घटना घडली आहे. अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा आणि पुढील कार्यवाही सुरू आहे. दुसरीकडे वसईतील सुसुपाडा येथे 4 वाहनांचा भीषण अपघात झाला आहे. कंटेनर, दोन कार आणि एक टेम्पो अशी एकूण चार वाहने एकमेकांवर आदळल्याची घटना दुपारच्या सुमारास घडली.

ढेकाळे येथील वाघोबा खिंड परिसरात घडलेल्या अपघातात दुचाकीवरील तिघांचा मृत्यू झाला असून मृतांची ओळख पटवण्याचे काम सध्या सुरू आहे. मनोर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेऊन मनोर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी हलवले आहेत. दरम्यान, अपघातानंतर घटनास्थळावरुन फरार झालेल्या अज्ञात वाहनाचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली असून पुढील तपास सुरू आहे.

## उंदीर मारण्याचे औषध टाकून 7 भटक्या श्वानांची हत्या... डोंबिवलीतील धक्कादायक घटना

■**डोंबिवली। प्रतिनिधी,**

डोंबिवलीतून संतापजनक घटना समोर आली आहे. उंदीर मारण्याच्या विषारी औषधामुळे सात भटक्या कुत्र्यांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती उघड झाली आहे. या प्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात एकलव्य ॲनिमल्स पेडिग्री कंपनीचे मालक वीरेंद्र कुमार निषाद यांच्यासह त्यांचा भाऊ आणि काही कामगारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच मृत श्वानांचे शव पोलिसांनी पोस्टमार्टमसाठी रुग्णालयात पाठवले असून पोस्टमार्टम रिपोर्ट नंतर पुढील कारवाई करणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**कठोर कारवाई होणार**

दरम्यान, मृत कुत्र्यांचे शव पोस्टमॉर्टमसाठी रुग्णालयात पाठवण्यात आले असून अहवाल आल्यानंतर पुढील कठोर कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीत सुमारे 90 हजार भटकी कुत्री असल्याची नोंद आहे. काही दिवसांपूर्वीच झालेल्या महासभेत या विषयावर चर्चा झाली होती. मात्र या घटनेमुळे प्राणी संरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.



**भटक्या कुत्र्यांना विष देऊन मारले**

डोंबिवलीजवळील धामटण गाव परिसरात भटक्या कुत्र्यांना विष देऊन मारल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. उंदीर मारण्याचे विषारी औषध परिसरात टाकून सात भटक्या कुत्र्यांचा जीव घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी प्राणीप्रेमी सामाजिक कार्यकर्त्या सुचित्रा किशोर सुर्वे यांनी मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून परिसरात खळबळ उडाली आहे.

**तक्रारीत गंभीर आरोप**

तक्रारीनुसार, सुचित्रा सुर्वे या गेल्या दोन वर्षांपासून धामटण गावातील एकलव्य कारखाना परिसरात राहत असून त्या 2021 पासून भटक्या कुत्र्यांना अन्न देत आहेत. त्यांच्या घराजवळच एकलव्य ॲनिमल्स पेडिग्री कंपनीचा कारखाना असून त्याचे मालक वीरेंद्र कुमार निषाद, त्यांचा भाऊ आणि काही कामगार यांनी 12 मार्च 2026 पासून परिसरात उंदीर मारण्याची पावडर टाकण्यास सुरुवात केल्याचा आरोप आहे. ही विषारी पावडर खाल्ल्याने सुरुवातीला चार आणि त्यानंतर आणखी तीन अशा एकूण सात कुत्र्यांचा मृत्यू झाला. तसेच याआधीही अशाच पद्धतीने एकूण 36 भटकी व पाळीव कुत्री मारल्याचा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

**पाळीव श्वानालाही मारण्याची धमकी**

याबाबत जाब विचारला असता आरोपींनी 'मी भटक्या कुत्र्यांना मारणारच, तुमच्या पाळीव श्वानालाही मारणार' अशी धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तसेच तक्रारदार महिला आणि त्यांच्या पतीलाही जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकरणी मानपाडा पोलिसांनी वीरेंद्र कुमार निषाद, त्यांचा भाऊ आणि काही कामगारांविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम 325 अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# ‘ओंजळभर पाण्या’चे शतक

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च १९२७ रोजी दलितांना पाण्याचा हक्क मिळवून देण्यासाठी केलेल्या या सत्याग्रहाला सामाजिक समतेच्या लढ्याचा पाया मानले जाते. राज्य सरकारतर्फे विकास आराखड्यांच्या घोषणांमुळे या ऐतिहासिक स्थळाला नव्याने उजाळा मिळत आहे.**

कोकण विभागातील रायगड जिल्ह्यातील महाडमधील ऐतिहासिक अशा चवदार तळ्याचा सत्याग्रह २० मार्च १९२७ रोजी थोर प्रज्ञावंत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांना पाण्याचा हक्क मिळण्यासाठी केला. या ऐतिहासिक घटनेच्या शतक महोत्सवाला शुक्रवारपासून सुरुवात झाली आहे. या ऐतिहासिक दिनाचे महत्त्व लक्षात घेऊन शुक्रवारी सकाळी ८.३० वाजता रायगड पोलीस दलातर्फे २१ पोलिसांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना चवदार तळ्याच्या प्रांगणामध्ये मानवंदना देण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्याचे समाज कल्याण मंत्री संजय शिरसाट, फलोत्पादन, रोजगार हमी, खार जमीन विकास मंत्री भरतशेट गोगावले, विविध शासकीय अधिकारी आणि बाबासाहेबांची लेकरे उपस्थित होती. त्यानंतर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री अदिती तटकरे व अन्य मान्यवर उपस्थित होते. राज्याचे मुख्यमंत्री यांनी प्रथम बाबासाहेबांच्या पुतळ्याला अभिवादन केले. त्यानंतर महाडच्या ऐतिहासिक भूमीवर असलेल्या भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूणार्कृती पुतळ्यावर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली. या पुतळ्याच्या खाली ‘‘हा संगर केवळ पाण्यासाठी नसून मानवी मूलभूत हक्कांसाठी आहे’’ असे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिले आहे. बाबासाहेबांच्या पुतळ्याच्या समोर २० मार्च ही तारीख झेंडूंच्या फुलांनी सजवलेली होती, तर बाजूने झेंडूंच्या फुलांच्या माळा करून लावल्या होत्या. त्यामुळे बाबासाहेबांचा पुतळा अधिक आकर्षित दिसत होता. चवदार तळ्याच्या बाजूच्या काठावर झेंडूंच्या फुलांच्या माळा करून लावल्या होत्या. बाजूने मंडप उभारले होते. स्मारक फुलांनी सजवले होते. उपस्थित आंबेडकरी अनुयायांना बसण्यासाठी व्यवस्था केली होती, तर चवदार तळ्याच्या बाजूने आकर्षक सजावट आणि विद्युत रोषणाई करण्यात आलेली होती. त्यामुळे चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या बाबासाहेबांच्या आठवणींना पुन्हा उजाळा मिळाला. प्रत्येक आंबेडकरी अनुयायी बाबासाहेबांना अभिवादन करीत होता. त्या परिसरात आंबेडकरी साहित्याची पुस्तके सवलतीच्या दरात विक्रीस ठेवण्यास आलेली होती. अनेक आंबेडकरी नेत्यांच्या सभा परिसरात सुरू होत्या. त्यात गायन पाटीर्चा कार्यक्रम जोरात चालू होता. अनेक आंबेडकरी कार्यकर्ते बाबासाहेबांची गाणी ऐकण्यात गुंग होते. भीम सैनिकांच्या प्रचंड गदीर्ने पूर्ण परिसर फुलून गेला होता. कडक उन्हाची तमा न मानता आंबेडकरी अनुयायी बाबासाहेबांच्या नावाच्या घोषणा देऊन बाबासाहेबांचा जय जयकार करत होते. आज जे आपण माणूस म्हणून जगतो आहोत त्याचे एकमेव कारण म्हणजे बाबासाहेब होय, याची पूर्ण कल्पना त्यांना आहे. राज्याचे मुख्यमंत्री यांनी या ठिकाणी उपस्थित आंबेडकरी अनुयांना मार्गदर्शन करताना त्यांनी या ऐतिहासिक भूमीत जीर्णोद्धाराचा संकल्प केला आहे. या ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार होण्यासाठी देशातील कानाकोपऱ्यांतून लाखो आंबेडकरी अनुयायी महाड चवदार तळ्यावर येऊन शतक महोत्सवी वषार्चे साक्षीदार झाले आहेत. म्हणजे काल ऐतिहासिक भूमीवर भीम सैनिकांचा महासागर लोटला होता. राज्यातील अनके संस्था एकत्र येऊन या ऐतिहासिक घटनेची एक आठवण म्हणून विविध कार्यक्रम वर्षभर आयोजित करीत आहेत. काही संस्थांनी त्या ठिकाणी जाऊन शतक महोत्सवी वर्षानिमित्ताने महाड क्रांतिदिन महोत्सवाचे आयोजन केले. आपल्या राज्याच्या अर्थसंकल्पात राज्याचे मुख्यमंत्री आणि राज्याच्या अर्थमंत्री पदाचा कार्यभार सांभाळणारे देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त पायाभूत सोयीसुविधांचा विकास आराखडा तयार करण्यात येणार असल्याचे ६ मार्च २०२६ रोजी घोषित केले. तसेच महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या माध्यमातून महाड चवदार तळ्याचे सुशोभीकरण करण्यासाठी २५ कोटी रुपये निधींची तरतूद करण्यात आली आहे, तर महाराष्ट्र सरकारच्यावतीने या ऐतिहासिक स्थळाला ‘सामाजिक समतेचे प्रतीक’ म्हणून चवदार तळ्याचे सुशोभीकरण, जलशुद्धीकरण आणि पर्यटन सुविधा पुरविण्यासाठी शतक महोत्सवी वर्षानिमिताने ५५.८० कोटी रुपये विकास आराखडा तयार करण्यात येऊन तो राबविण्यात येणार आहे. तसेच लाखो आंबेडकरी अनुयायी चवदार तळे सत्याग्रहाच्या निमित्ताने येत असल्यामुळे त्यांची निवास व्यवस्था, आरोग्य सेवा, पिण्याचे पाणी, भोजन व्यवस्था, स्वच्छता व्यवस्थापन स्थानिक प्रशासनाच्या वतीने करण्यात आली. महाडमधील चवदार तळ्यावर पिण्याच्या पाण्याचा सत्याग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी करून चवदार तळे दलितांना पिण्याच्या पाण्यासाठी खुले करून दिले. आपल्या देशातील सामाजिक समतेचा हा पहिला सत्याग्रह आहे. त्यामुळे महाडचे चवदार तळे म्हणजे महाराष्ट्राच्या सामाजिक क्रांतीचा ऐतिहासिक ठेवा आहे. आज जरी चवदार तळे सत्याग्रह महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाने जगप्रसिद्ध झाले तरी महाड चवदार तळ्यातील ओंजळभर पाण्याने खरा इतिहास घडविला आहे. तेव्हा महाडच्या चवदार तळ्यावर ऐतिहासिक सत्याग्रह झाला त्या घटनेचे शतक महोत्सवी वर्ष साजरे करण्यात सुरुवात जरी झाली तरी खरे शतक ओंजळभर पाण्याचे समजून घेतले पाहिजे. त्यासाठी सुद्धा संघर्ष करावा लागला होता. तरच महाड चवदार तळ्याचे शतक महोत्सव वर्ष साजरे केल्याचे फलित होईल.

# गाझा, व्हेनेझुएला, इराणनंतर ट्रम्पच्या रडारवर कोण?

मनमानी आणि बेमूर्वत कारभारासाठी ख्यात डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकन अध्यक्षपदाला काळीमा फासला आहे. एकीकडे शांततेचा नोबेल पुरस्कार मिळावा असा हट्ट धरायचा आणि दुसरीकडे कोट्यवधी निष्पाप जीवांशी खेळायचे, अशी त्यांची अहमहमिका आहे. गाझा पट्टीमध्ये शेकडो कुटुंबांना उद्ध्वस्त केल्यानंतर तेथे भव्य पर्यटन सिटी साकारण्याचा मनसुबा व्यावसायिक ट्रम्प यांनी जाहीर केला. सारे जगच त्याने अचंबित झाले. हे सारे थांबत नाही तोच ट्रम्प यांच्या आदेशाने व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांची पत्नी सेलिया फ्लोरेस यांचे पहाटेच्या सुमारास अपहरण झाले. अमेरिकन फौजांनी अध्यक्ष निवासात घुसून ही कारवाई केली. त्यानंतर गेल्या महिन्यात इराणचे सर्वेसर्वा अली खामेनी यांच्यासह सत्ताधारी गटातील अनेक उच्चपदस्थ अधिकारी आणि इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सच्या नेत्यांची निर्घृण हत्या करण्यात आली. आंतरराष्ट्रीय कायदे, नियम आणि संकेतांना केराची टोपली दाखवत ट्रम्प यांची ही हुकूमशाही जगासाठी चिंताजनकच आहे. आता त्यांनी क्युबा या देशाकडे मोर्चा वळविला आहे.

जगाचे लक्ष सध्या इराण आणि इस्रायलमधील युद्धाकडे लागलेले असतानाच कॅरेबियन देश क्युबा एका भीषण अंधकारमय संकटात सापडला आहे. पश्चिम आशिया धगधगत असताना क्युबाची राजधानी हवानासह संपूर्ण देश सलग दुसऱ्यांदा 'ब्लॅकआऊट'चा सामना करत आहे. क्युबाची मुख्य वीज ग्रीड अचानक कोलमडल्यामुळे सुमारे १.१ कोटी जनता अंधारात बुडाली आहे. हे संकट केवळ वीज जाण्यापुरते मर्यादित नाही; याचे परिणाम अत्यंत गंभीर आहेत. रुग्णालये विजेविना ठप्प झाली आहेत. आपत्कालीन शस्त्रक्रिया आणि व्हेंटिलेटरवर असलेल्या रुग्णांच्या जीवाचा धोका वाढला आहे. रस्त्यावरील सिग्नल यंत्रणा आणि इंधन पंप बंद पडल्याने वाहतूक व्यवस्था ठप्प झाली आहे. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि अन्नाचे साठवणूक (रेफ्रिजरेशन) यावरही मोठा परिणाम झाला आहे.

क्युबातील या परिस्थितीला नैसर्गिक कारणांपेक्षा राजकीय कारणे अधिक जबाबदार मानली जात आहेत. अमेरिकेने क्युबावर लादलेले कठोर आर्थिक निर्बंध हे या संकटाचे मूळ कारण



गाझात हाहाकार करून तेथे पर्यटन शहर साकारण्याची घोषणा, व्हेनेझुएलाच्या अध्यक्षांचे झोपेतच अपहरण, इराणच्या अध्यक्षांसह महत्त्वाच्या नेत्यांची हत्या केल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांच्या निशाण्यावर आता कोणता देश आहे?

आहे. अमेरिकेच्या धोरणांमुळे आंतरराष्ट्रीय बाजारातून तेल खरेदी करणे क्युबासाठी अशक्य झाले आहे. इंधन नसल्यामुळे वीज प्रकल्पांची इंजिने शांत पडली आहेत. निर्बंधांमुळे क्युबाला जुन्या झालेल्या पॉवर प्लांट्ससाठी सुटे भाग मिळत नाहीत, ज्यामुळे यंत्रणा वारंवार कोलमडत आहे.

अमेरिकेत यंदा निवडणूक रणधुमाळी असणार आहे. हे जाणून डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा आपल्या आक्रमक परराष्ट्र धोरणाचे संकेत दिले आहेत. गाझा, व्हेनेझुएला आणि इराणनंतर आता ट्रम्प यांच्या रडारवर क्युबा असल्याचे चित्र दिसत आहे. ट्रम्प यांनी आपल्या मागील कार्यकाळात देखील क्युबावर सर्वाधिक निर्बंध लादले होते. आता पुन्हा सत्तेत आल्याने त्यांनी हे निर्बंध अधिक कडक केले आहेत. ट्रम्प यांचा 'क्युबा'ला विरोध हा केवळ आर्थिक नसून राजकीय आहे. क्युबाची अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडवून तिथे राजकीय परिवर्तन घडवून आणणे, हा यामागील सुप्त हेतू आहे. आपल्या मजीर्चे सत्ताधारी तेथे असावेत आणि क्युबातील नैसर्गिक साधन संपत्तीवर ताबा मिळावा यासाठी ट्रम्प यांचा अट्टाहास आहे. क्युबातील जनता आधीच महागाई आणि अन्नधान्याच्या टंचाईशी झुंजत असताना, या वीज संकटामुळे त्यांच्या संयमाचा अंत पाहायला मिळत आहे.

क्युबाचा सर्वात मोठा मित्र देश व्हेनेझुएला सध्या स्वतःच्या अंतर्गत समस्यांनी आणि अमेरिकन दबावामुळे क्युबाला इंधन पुरवठा करू शकत नाही. इंधनाअभावी वीज प्रकल्प चालवणे क्युबासाठी जिकिरीचे झाले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या आक्रमक विधानांनी पुन्हा एकदा जागतिक राजकारणात खळबळ माजवून दिली आहे. गाझामध्ये भीषण युद्धानंतर तिथे 'पर्यटन शहर' उभारण्याचे त्यांचे विधान हे केवळ व्यावसायिक नसून ते 'साम्राज्यवादी' मानसिकतेचे निदर्शक मानले जात आहे. व्हेनेझुएलाच्या अंतर्गत व्यवस्थेत केलेली ढवळाढवळ आणि इराणमधील खामेनी यांच्या पश्चात निर्माण झालेली पोकळी, या सर्वांनंतर ट्रम्प यांचे लक्ष आता क्युबाकडे वळले आहे. "क्युबा हा एक अयशस्वी देश आहे, त्यांच्याकडे पैसे नाहीत, तेल नाही. त्यांच्याकडे फक्त सुंदर जमीन आहे," असे विधान करत ट्रम्प यांनी क्युबावर ताबा मिळवण्याचे किंवा तिथे सत्तापरिवर्तन करण्याचे संकेत दिले आहेत.

इतिहासाची पाने चाळता क्युबा आणि अमेरिकेचे संबंध अनेक चढ-उतारांनी भरलेले आहेत. विशेषतः क्युबन मिसाईल क्राईसिसनंतर दोन्ही देशांमध्ये अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले. काही दशकांनी संबंध सुधारण्याचा प्रयत्न झाला. बराक ओबामा यांनी ५० वर्षांपासूनचा शत्रूभाव संपवून 'मैत्रीपूर्ण' संबंध प्रस्थापित करण्यावर भर दिला होता. ओबामांनी क्युबाचे नाव 'दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या देशांच्या' यादीतून काढून टाकले. ८८ वर्षांनंतर क्युबाला भेट देणारे ओबामा हे पहिले अमेरिकन राष्ट्राध्यक्ष ठरले. ओबामांचे धोरण 'निबंर्धांऐवजी संवादातून बदल' घडवण्याचे होते, ज्यामुळे दोन्ही देशांतील तणाव मोठ्या प्रमाणात कमी झाला होता. आता ट्रम्प यांच्या अध्यक्षीय कार्यकाळात क्युबाशी पुन्हा संबंध बिघडले आहेत.

इतिहास साक्ष आहे की, अमेरिकेने जेव्हा जेव्हा एखाद्या देशावर 'आर्थिक निर्बंध' लादले, तेव्हा तिथे सत्तापालटाचा मार्ग मोकळा झाला आहे. क्युबाच्या बाबतीतही हेच घडताना दिसत आहे. वीज कपातीमुळे लोकांमध्ये असलेला असंतोष वाढवून, तिथल्या कम्युनिस्ट राजवटीला शह देणे हा अमेरिकेचा मुख्य उद्देश आहे. या सर्व घडामोडींचा परिणाम केवळ त्या देशांपुरता मर्यादित नाही. इराणमधील युद्धामुळे कच्च्या तेलाचे दर गगनाला भिडले आहेत, ज्याचा थेट फटका भारतीय अर्थव्यवस्थेलाही बसत आहे. क्युबातील अस्थिरता ही रशिया आणि चीनच्या वर्चस्वाला अमेरिकेने दिलेले थेट आव्हान आहे.

गाझा पट्टीत सुमारे २१ लाख नागरिक राहतात. ऑक्टोबर २०२३ पासून सुरू झालेल्या युद्धात जवळपास ५० हजार जणांची निर्घृण हत्या झाली आहे. यात महिला आणि मुलांची संख्या मोठी आहे. सुमारे लाखभर जखमी झाले आहेत, तर १९ लाख जण बेघर झाले आहेत. व्हेनेझुएलाची एकूण लोकसंख्या सुमारे २.९ कोटी आहे. तेथे थेट युद्ध सुरू नसले तरी राजकीय अस्थिरता आणि आर्थिक संकटामुळे गेल्या काही वर्षांत लाखो लोकांनी देश सोडला आहे. इराणची एकूण लोकसंख्या सुमारे ८.९ कोटी आहे. इराण आणि इस्रायल यांच्यातील थेट संघर्षात आतापर्यंत झालेल्या जीवितहानीचा निश्चित आकडा समोर आलेला नाही. मात्र, गेल्या १८ दिवसांत शेकडो जण ठार झाले आहेत. अनेक पायाभूत सुविधा नष्ट झाल्या आहेत. शेकडो लोक जखमी झाल्याचा अंदाज आहे. क्युबाची एकूण लोकसंख्या सुमारे १.१ कोटी आहे. सध्या तेथे युद्ध सुरू नसले तरी वीज, अन्न आणि औषधांचे मोठे संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. म्हणजेच, कोट्यवधी जनतेच्या जीवाशी खेळ करण्याचे काम ट्रम्प यांच्याकडून सुरू आहे.

एकीकडे इराण-इस्रायल युद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्था अस्थिर आहे, तर दुसरीकडे क्युबासारखा छोटा देश महासत्तांच्या राजकारणात भरडला जात आहे. जर क्युबातील हे वीज संकट लवकर सुटले नाही, तर तिथे मोठे मानवी संकट उभे राहण्याची शक्यता आहे. गाझातील ढिगाऱ्यांवर रिसॉर्ट्स उभारण्याचे स्वप्न पाहणारी महासत्ता आणि व्हेनेझुएला व इराणमध्ये नेतृत्व संपवून लोकशाही आणण्याचा दावा करणारी यंत्रणा, आता क्युबाला 'अंधारातून प्रकाशाकडे' नेण्याच्या नावाखाली कोणत्या थराला जाईल, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. क्युबाचा हा 'ब्लॅकआऊट' केवळ विजेचा नसून, तो एका छोट्या राष्ट्राच्या सार्वभौमत्वावर आलेल्या संकटाचा इशारा आहे. दरम्यान, अमेरिकेच्या पावलावर पाऊल ठेवून चीनने तैवानचा घास घेण्याचा प्रयत्न केला तर ते नवल राहणार नाही, असे तज्ज्ञांचे मत आहे.



# ‘भव्य’त्वाची येवो प्रचिती

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी त्यांच्या २०२६-२७च्या अर्थसंकल्पात ‘भारत औद्योगिक विकास योजना’ जाहीर केली होती. केंद्रीय मंत्रिमंडळाने त्यास बुधवारी दिलेली मंजुरी हे देशातील औद्योगिक उत्पादनवाढीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असे पाऊल आहे. केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारला योजनांना नावे देताना त्यांतून भव्यतेची भावना ध्वनित व्हावी, असे वाटत असते. त्या शिरस्त्यानुसार या योजनेच्या इंग्रजी नावातील आद्याक्षरांना अनुसरून त्याचे देवनागरीतील लघुरूप ‘भव्य’ असे होते व तेच आता रूढ होईल. अर्थात, या अशा शब्दांच्या खेळात अडकण्याची गरज नाही. या शब्दांच्या पलीकडे जाऊन देशाच्या हाती काय पडते, हे महत्त्वाचे.

आजच्या काळात सेवा क्षेत्र हे कुठल्याही देशाच्या आर्थिक विकासासाठी आवश्यकच. आपल्या देशाच्या जीडीपीमध्ये या क्षेत्राचा सध्याचा वाटा साधारण ५५ टक्क्यांच्या आसपास आहे. तुलनेत उत्पादन क्षेत्राचा वाटा साधारण १६ ते १७ टक्के. हा आकडा येत्या चार वर्षांत २५ टक्क्यांपर्यंत नेण्याचे केंद्राचे लक्ष्य आहे. त्यास अनुसरून काही पावले टाकली जात आहेत. ‘भव्य’ योजनेसाठी ३३,६६० कोटी रुपये मंजूर करण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय म्हणजे त्यातलेच एक पाऊल. सध्याची देशातील परिस्थिती व आंतरराष्ट्रीय परिस्थिती पाहता अशा योजनांची गरज होती व यापुढेही असेलच. त्यामुळे ‘भव्य’चे स्वागत.

‘भव्य’ योजनेचे तपशील जाहीर झालेले आहेत. ही योजना सहा वर्षांसाठी आहे. या योजनेत देशभरात १०० ठिकाणी ‘प्लग अँड प्ले’ तत्त्वावरील औद्योगिक पार्क विकसित करण्यात येणार आहेत. म्हणजे उद्योजकांना तयार स्थितीतील पायाभूत सोयीसुविधा मिळतील. जमिनींच्या मंजुरीसाठी खेटा घालणे टळेल. विविध सेवांसाठी इकडून तिकडे असे हेलपाटे मारावे लागणार नाहीत, असे सरकार म्हणते आहे. म्हणजेच नोकरशाहीचा जाच कमी होईल, अशी आशा बाळगता येईल. किमान १०० ते कमाल एक हजार एकर इतक्या क्षेत्रात ही पार्क उभारण्यात येणार असून, त्यासाठी केंद्राकडून प्रतिएकर एक कोटी रुपयांचे साह्य मिळणार आहे. ही पार्क कुठे स्थापायची याचा निर्णय स्पर्धात्मक पद्धतीने केला जाणार आहे. यातून सुमारे १५ लाख रोजगार निर्माण होतील, असा सरकारचा अदमास आहे. आजच्या काळातील हा प्रश्न महत्त्वाचा. नुकत्याच आलेल्या एका अहवालाने देशातील ४० टक्के पदवीधर बेरोजगार आहेत, यावर बोट ठेवलेले आहे. यावरून आजची रोजगार निर्मितीची निकड कळावी व ही योजना स्वागतार्ह का हेही उमजून यावे.

पायाभूत सुविधा उभारण्याचा धडाका केंद्राने लावलेला असल्याचे दिसत असले तरी उद्योगांच्या विकासाच्या दृष्टीने तो पुरेसा नाही. अनेक ठिकाणी विजेसारखी मूलभूत गरजही पूर्णाथार्ने भागवली जात नाही. प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता ही आणखी एक अडचण. त्यात भर विदेशी व तुलनेने स्वस्त अशा उत्पादनांनी उभ्या केलेल्या आव्हानाची. हे असे चित्र असल्याने गुंतवणूकदार चटकन पुढे येण्यास धजावत नाहीत, हे मोठे दुखणे आहे. शेजारच्या - अगदी चीनसकट - देशांना भारतात गुंतवणुकीसंदर्भात नुकत्याच काही सवलती जाहीर करण्यात आल्या. आपल्याकडील अनेकांच्या बाहूंमध्ये चीन म्हटले की स्फुरण चढते आणि जणू काही आत्ताच ते सीमेवर जाऊन चिनी सैनिकांशी लढतील, असा त्यांचा बाणा असतो. असे असताना, गुंतवणुकीबाबत शेजाऱ्यांना दिलेल्या सवलती या केंद्र सरकारच्या वास्तववादी दृष्टिकोनाचा परिचय देणाऱ्या आणि म्हणून योग्यच आहेत.

भारत-अमेरिका यांच्यातील स्थगित झालेला व्यापार करार, धगधगते आखात अशा आंतरराष्ट्रीय पटलाच्या पार्श्वभूमीवर ‘भव्य’ची घोषणा झालेली आहे, हे लक्षात घ्यायला हवे. हा सगळा पट ध्यानात घेत असताना सन २००५मध्ये आलेल्या ‘एसईझेड’ (विशेष आर्थिक क्षेत्र) योजनेचेही स्मरण होणे अनिवार्य. सन २००५मध्ये या संदभार्तील कायदा झाल्यानंतर प्रारंभी त्यास उत्तम प्रतिसाद मिळाला. मात्र नंतर करसवलती मागे घेण्यात आल्या नि उद्योग क्षेत्रही त्यातून मागे हटू लागले. मूळ ‘एसईझेड’ कायद्याची जागा घेणारे ‘देश’ हे विधेयक सुमारे चार वर्षे रखडले आहे. अगदी आत्ताच, ‘एसईझेड’ योजनेचा आढावा घेण्यासाठी व त्याच्या दुसऱ्या टप्प्यातील आराखडा ठरवण्यासाठी केंद्राने समिती स्थापली आहे. ‘भव्य’ची अंमलबजावणी करताना या आधीच्या घटनांतून (किंवा चुकांतून!) काही धडे मोदी सरकारला घेता येतील. हे सारे जमून आले तर देशाला ‘भव्य’त्वाची प्रचिती येण्याची आशा बाळगता येईल. ती तशी येवो, ही सदिच्छा.

# या ज्योतिष्याला राजाश्रय कुणाचा?





नाशिकमध्ये कथित ज्योतिषी कॅप्टन अशोक खरात याला लैंगिक शोषणाच्या आरोपावरून अटक झाली. ही घटना समाज, अंधश्रद्धा आणि राजकारण यांच्यातील धोकादायक संगनमताचे गंभीर उदाहरण आहे. अशा प्रकारच्या घटना महाराष्ट्रात नवीन नाहीत; परंतु प्रत्येक वेळी त्यातून उघड होणारी बाब म्हणजे स्वतःला बाबा, गुरू किंवा ज्योतिषी म्हणवून घेणार्या व्यक्तींना मिळणारा राजकीय आश्रय आणि त्यातून निर्माण होणारे अभेद्य सत्ताकवच. या प्रकरणातही काही मोठ्या नेत्यांची नावे पुढे येत असल्याने प्रश्न अधिकच तीव्र होतो. समाजात अशा प्रवृत्तींना खतपाणी नेमके कोण घालत आहे? अशोक खरात याच्यावरचे आरोप अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहेत. लैंगिक शोषणासारखा गुन्हा हा वैयक्तिक पातळीवरील विकृती आहेच; शिवाय तो सत्तेचा आणि प्रभावाचा गैरवापर आहे. अशा बाबांकडे अनेक लोक श्रद्धेने जातात, त्यांच्या आयुष्यातील समस्या सोडवण्यासाठी त्यांच्यावर विश्वास ठेवतात. हाच विश्वास अशा व्यक्तींकडून शस्त्रासारखा वापरला जातो. जेव्हा एखादी व्यक्ती स्वतःला आध्यात्मिक किंवा अलौकिक शक्ती असलेली म्हणून सादर करते, तेव्हा तिच्याभोवती एक प्रकारची भीती आणि आकर्षण तयार होते. यामुळे पीडित व्यक्तींना आवाज उठवणे कठीण जाते.

या प्रकरणात विशेष लक्षवेधी बाब म्हणजे काही प्रभावशाली राजकीय नेत्यांशी या बाबाचे संबंध असल्याची चर्चा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर, मंत्री दीपक केसरकर, आमदार जयंत पाटील, खासदार नीलेश लंके यांसारख्या अनेक दिग्गज नेत्यांची नावे समोर येत आहेत. जेव्हा राजकीय नेते अशा व्यक्तींशी संबंध ठेवतात, त्यांना सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये स्थान देतात किंवा त्यांच्याकडून आशीर्वाद घेताना दिसतात, तेव्हा समाजात चुकीचा संदेश जातो. जर इतके मोठे नेते या बाबावर विश्वास ठेवतात, तर ते नक्कीच योग्य असतील असे सामान्य नागरिकांना वाटते. परिणामी अशा बाबांची सामाजिक मान्यता वाढते आणि त्यांना अधिक बळ मिळते. अशोक खरात याच्यावर लैंगिक शोषणासारखा गंभीर आरोप असताना, त्याच्या संस्थेशी थेट संबंध असलेल्या रूपाली चाकणकर या महिला आयोगाच्या अध्यक्ष आहेत, ही बाब धक्कादायक आणि संतापजनक आहे. महिला आयोग म्हणजे महिलांच्या हक्कांचे रक्षण करणारी, अन्यायाविरोधात उभी राहणारी सर्वोच्च राज्यव्यवस्थेतील संस्था. पण ज्या व्यक्तीवर महिलांच्या सुरक्षेची जबाबदारी आहे, तिचेच नाव अशा संशयित व्यक्तीच्या संस्थेशी जोडले जाते, तेव्हा संपूर्ण व्यवस्थेची विश्वासार्हता कोलमडते. हे केवळ योगायोग म्हणून झटकून टाकणे म्हणजे लोकांच्या बुद्धीचा अपमान आहे.

सत्ताधार्यांची भूमिका इथे अत्यंत संशयास्पद ठरते. जर एखादा सर्वसामान्य कार्यकर्ता अशा प्रकरणात अडकला असता, तर पोलिसांची कारवाई, माध्यमांचा दबाव आणि राजकीय निषेध यांचा भडिमार झाला असता. पण जेव्हा सत्तेशी जवळीक असते, तेव्हा अचानक मौन पाळले जाते, चौकशी संथ होते आणि जबाबदारी टाळण्याचा खेळ सुरू होतो. ही दुहेरी मापदंडांची पद्धत लोकशाहीसाठी घातक आहे. महाराष्ट्रात यापूर्वीही अशा अनेक घटना घडलेल्या आहेत. काही बाबांनी स्वतःला देवाचा अवतार सांगून महिलांचे शोषण केले, तर काहींनी चमत्कारांच्या नावाखाली लोकांची फसवणूक केली. या सर्व घटनांमध्ये एक समान धागा दिसतो. राजकीय आणि सामाजिक संरक्षण. अनेक वेळा अशा बाबांविरुद्ध तक्रारी येतात, परंतु त्यावर कारवाई होत नाही किंवा ती खूप उशिरा होते. कारण त्यांच्यामागे असलेली राजकीय ताकद. पोलीस यंत्रणेलाही अशा प्रकरणांमध्ये दबावाचा सामना करावा लागतो. अंधश्रद्धा हा या समस्येचा केंद्रबिंदू आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यातही लोक मोठ्या प्रमाणावर ज्योतिष, तांत्रिक उपाय, चमत्कार यांवर विश्वास ठेवतात. शिक्षण आणि विज्ञानाचा प्रसार झाला असला तरी मानसिक पातळीवर अंधश्रद्धा अजूनही घट्ट रुजलेली आहे. जेव्हा एखादी व्यक्ती संकटात असते, आर्थिक, कौटुंबिक किंवा आरोग्याशी संबंधित ही समस्या असते, तेव्हा ती कोणत्याही आशेच्या किरणाकडे धाव घेते. याच मानसिकतेचा फायदा अशा बाबांकडून घेतला जातो.

राजकीय नेत्यांची भूमिका येथे अत्यंत महत्त्वाची ठरते. त्यांनी अशा व्यक्तींना सार्वजनिक मान्यता देणे थांबवले पाहिजे. परंतु वास्तवात अनेक नेते स्वतःच अशा बाबांकडे जातात. यामागे काही वेळा वैयक्तिक श्रद्धा असू शकते, परंतु अनेक वेळा हा एक राजकीय डाव असतो. अशा बाबांकडे मोठा भक्तवर्ग असतो आणि त्या माध्यमातून मतदारांवर प्रभाव टाकता येतो. त्यामुळे राजकारणी या बाबांशी संबंध ठेवतात, त्यांना संरक्षण देतात आणि त्यांच्याद्वारे अप्रत्यक्षपणे राजकीय लाभ मिळवतात. ही परिस्थिती अत्यंत धोकादायक आहे. यामुळे कायद्याचा आणि न्यायव्यवस्थेचा अपमान होतो. जेव्हा एखाद्या बाबावर गंभीर आरोप असतानाही त्याला राजकीय पाठबळ मिळते, तेव्हा पीडित व्यक्तींना न्याय मिळण्याची शक्यता कमी होते. प्रभावशाली लोकांवर कारवाई होत नाही असा समाजात संदेश जातो. यामुळे लोकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास कमी होतो. यावर उपाय काय? सर्वप्रथम समाजाने स्वतःची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. अंधश्रद्धेला खतपाणी घालर्णाया गोष्टींपासून दूर राहणे, वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे आणि कोणत्याही व्यक्तीला अंधपणे पूजण्याऐवजी प्रश्न विचारण्याची सवय लावणे गरजेचे आहे. दुसरे म्हणजे, राजकीय नेत्यांनी स्वतःच्या वर्तनातून आदर्श घालून दिला पाहिजे. त्यांनी अशा बाबांपासून अंतर ठेवले पाहिजे आणि समाजालाही तसे करण्यास प्रोत्साहित केले पाहिजे. तिसरे म्हणजे, कायद्याची कडक अंमलबजावणी. महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलनासाठी कायदे आहेत, परंतु त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. पोलीस आणि प्रशासनाने कोणत्याही दबावाला बळी न पडता अशा प्रकरणांवर तातडीने आणि कठोर कारवाई केली पाहिजे. तसेच पीडितांना संरक्षण आणि न्याय मिळवून देण्यासाठी विशेष यंत्रणा उभारली पाहिजे. अशोक खरात प्रकरण हे एक वेगळे उदाहरण नाही, तर एका मोठ्या आणि खोलवर रुजलेल्या समस्येचे लक्षण आहे. जोपर्यंत समाज, राजकारण आणि प्रशासन या तिन्ही पातळ्यांवर बदल होत नाही, तोपर्यंत अशा घटना घडत राहतील. प्रश्न केवळ एका बाबाचा नाही, तर त्या संपूर्ण व्यवस्थेचा आहे जी अशा बाबांना निर्माण करते, पोसते आणि शेवटी त्यांना संरक्षण देते.

# फीट आणि योग्य : बूट हुशारीने निवडा!

**चप्पल आपल्याला संरक्षण देतात आणि ती एक फॅशन ॲक्सेसरीही आहे. अनेकदा चुकीचे फुटवेअर वापरले जातात, तेव्हा त्याचे शरीरावरील परिणाम समजून घेतल्याने आणि योग्य बूट निवडल्याने तुमच्या समस्या सुटू शकतात.**

**हाय हिल्स :**

हाय हिल्समुळे पायाच्या चवड्यांवर अतिरिक्त ताण येतो आणि त्यामुळे वेदना तसेच कॉलोसाइट्सचा त्रास होतो. त्यांच्यामुळे आपले घोटेही मुरगळू शकतात. हाय हिल्सचा दीर्घकाळ वापर केल्यामुळे पोटरीचे स्नायू लहान होऊ शकतात आणि पायात वेदना होतात. ते गुडघे, नितंब आणि मणक्यांवर अतिरिक्त ताण आणतात. त्यामुळे इतर समस्या उद्भवू शकतात. नियमित वापरासाठी २ इंचापेक्षा जास्त हिल्स वापरणे टाळा.

**फूटवेअर आणि गुडघ्याचे ऑस्टिओआर्थरायटिस :**

तुम्हाला गुडघ्याच्या वेदना किंवा आर्थरायटिसचा त्रास असल्यास कठीण किंवा टणक बूट आणि हाय हिल्स घालणे टाळा. संशोधनातून असे दिसून आले आहे की, कमी हिल्सचे लवचिक फूटवेअर (०.५ इंच) गुडघ्यांवरील ताण कमी करते.

**फूटवेअर आणि मधुमेह :**

दीर्घकाळ मधुमेह असल्यामुळे नसांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे पायात बधीरपणा येतो. त्याचा परिणाम म्हणून आपल्याला पायात कापलेले किंवा पुरळ आलेले जाणवत नाही आणि ते वेगाने गंभीर संसर्गात परावर्तित होऊ शकते. पायांची नियमित तपासणी करून लालसरपणा, पुरळ किंवा कापलेले असलेले तपासल्यास आणि खास मऊ फूटवेअरचा वापर केल्यास मधुमेहींमध्ये गंभीर गुंतागुंत टाळता येऊ शकते.



**फीट**

नवीन फूटवेअर खरेदी करताना तुमच्या पायांची लांबी आणि रुंदी मोजून घ्या. कारण, काळानुसार तुमच्या पायांचा आकार बदलू शकतो. तुम्ही पायाचा आकार संध्याकाळी मोजला पाहिजे, कारण दिवस संपताना पाय थोडासा सुजतो. तुमचे अंगठ्याचे बोट आणि बुटाचे टोक यांच्यामध्ये साधारण अर्धा इंच जागा असली पाहिजे. तुमच्या पायाचा सर्वात मोठा भाग बुटामध्ये घट्ट बसला किंवा चिमटला जायला नको. तुमचे बूट पायापेक्षा लहान असल्यास तुमच्या टाचेला त्रास होऊ शकतो. निमुळत्या फूटवेअरमुळे कॉर्न किंवा बुनियन्स होऊ शकतात. बूट खूप मोठे असल्यास घसरल्यामुळे पुरळ आणि वेदना होऊ शकतात.

**योग्य फूटवेअरचा वापर**

**फील :**

तुम्हाला चपलेत आरामदायी वाटले पाहिजे. आरामदायीपणा तपासण्यासाठी स्टोअरमध्ये नवीन चप्पल घालून चाला. तुमचा पाय जमिनीवर आपटतो तेव्हा त्याचा परिणाम कमी करण्यासाठी बुटाला पुरेशा प्रमाणात कुशन असले पाहिजे. लक्षात ठेवा, बूट तुमच्या पायानुसार असावेत, पाय बुटांप्रमाणे जुळवू नका.



**फ्रेमवर्क :**

चौरस किंवा गोल टो-बॉक्स असलेले बूट निवडा. टोकदार टो-बॉक्स असल्यास तुम्हाला कॉर्न, कॅलॉसाइटिस, बुनियन्स, टाचेतील नादुरुस्ती आणि पुरळ यांचा त्रास होऊ शकतो. बुटाची पुढची बाजू तुमच्या पायाच्या पुढच्या बाजूशी जुळती असावी. हील काऊंटर (बुटाची मागची बाजू) इतकी मजबूत असावी की, पाय मुरगळणार नाही आणि तुमच्या घोट्याला सपोर्ट मिळेल.

**बूट बदलण्याची वेळ कधी :**

तुमचे बूट खूप घासलेले असल्यास, तुमच्या घोट्याकडेही घासलेले असल्यास ते घर्षण आणि वापराचे परिणाम किंवा चिन्ह आहेत आणि ती तुमचे बूट बदलण्याची वेळ आहे. शेवटी, उद्दिष्टित कार्यासाठी योग्य बुटांचा वापर करा. स्टाईलसाठी आरामदायीपणाशी तडजोड करू नका.



# मधाचे फेसपॅक

**मध हे आपल्या आरोग्यासाठी औषधी आहे. मध हे आपल्या त्वचेवरही गुणकारी असल्याचे सिद्ध झाले आहे. बाजारात आलेले केमिकलयुक्त फेसपॅकमुळे आपल्या त्वचेवर विपरित परिणाम होत असतो. मधाचा फेसपॅक घरच्या घरी तयार करून आपली त्वचेचा सतेजपणा कायम ठेवता येऊ शकतो.**

▮ मुलतानी मातीचे पावडर, गुलाबजल, मध (शहद) व संत्र्याचा रस प्रत्येक एक-एक चमचा घेऊन त्याची पेस्ट तयार करून रात्री झोपण्याआधी चेहऱ्यावर लावावी. १० ते १५ मिनिटांनी चेहरा स्वच्छ करावा.

▮ एक चमचा मधात एका अंड्याच्या बलक घालून चेहऱ्यावर लावावा. १० मिनिटानी चेहरा स्वच्छ करावा.

▮ पिकलेल्या केळीचा गर, कणीक व एक मोठा चमचा मध यांची पेस्ट चेहऱ्यावर लावावी. १० मिनिटांनंतर चेहरा थंड पाण्याने स्वच्छ करावा.

# क्रोकरी करा चकाचक

**प्रत्येक** महिलेला वाटते स्वयंपाकघरात काचेची उपकरणे असावीत. क्रोकरीचे आकर्षक प्रकार बाजारात उपलब्ध असल्यामुळे त्याची भुरळ पडल्याशिवाय राहात नाही. डायनिंग टेबलवर स्टायलिश क्रोकरी अधिक शोभून दिसतात. मात्र ही काचेची भांडी बरीच महाग असतात. शिवाय त्यांचा वापर अत्यंत काळजीपूर्वक करावा लागतो. खबरदारी घेतली नाही तर किती सामानाचे नुकसान होण्याची शक्यता असते. स्वच्छतेबाबतही क्रोकरीची विशेष काळजी घ्यावी लागते.



काचेची चमक टिकून राहण्याचे काही वेगळे मार्ग अवलंबावे लागतात. आज यासंबंधी काही महत्त्वाच्या टिप्स जाणून घेऊ या. क्रोकरीवर डाग राहू नये, असे वाटत असेल तर ती वेळच्या वेळी स्वच्छ करायला हवी. फार काळ अस्वच्छ अवस्थेत ठेवल्यास डाग टिकून राहतात आणि स्वच्छ करणे कठीण होते. काचेची भांडी स्वच्छ करण्यासाठी गार पाण्याऐवजी गरम पाण्याचा वापर करावा. गरम पाण्याचा वापर केल्याने साबणाचा कमीत कमी वापर करून ही भांडी स्वच्छ करणे शक्य होते. गरम पाण्यामुळे भांडी स्वच्छ होतातच, शिवाय त्यावरील जीवजंतूंचाही नायनाट होतो. क्रोकरी स्वच्छ केल्यानंतर काही काळ व्हिनेगर मिसळलेल्या पाण्यात बुडवून ठेवावी. काही वेळाने बाहेर काढून न धुताच भांडी सुकवावी. यामुळे क्रोकरीची चमक टिकून राहते. काचेची भांडी धुतल्यानंतर त्यावर लिंबू रगडावे. लिंबामुळे न दिसणारे डागही निघून जातात आणि वेगळी चमक येते. लिंबू चोळण्यानंतर भांडी परत एकदा धुवून घेण्यास विसरू नये. क्रोकरीच्या आतल्या कडा स्वच्छ करण्यासाठी जुन्या ब्रशवर टूथपेस्ट घ्यावी आणि त्याने हलक्या हाताने स्वच्छता करावी. त्यानंतर कोमट पाण्याने भांडी धुवून घ्यावी.

# सतत जांभया येत आहेत का? मग त्यामागे असू शकतात ही कारणे

**वारंवार** जांभया येत असतील तर झोप अपुरी झाली असल्याचे हे लक्षण असल्याचे आपण मानतो. मात्र केवळ झोप अपुरी झाली असली तरच सतत जांभया येतात असे नाही. यामागे अन्य काही कारणेही असू शकतात. ही कारणे जाणून घेऊ या. सातत्याने येणाऱ्या जांभया हे मानसिक तणावाचे लक्षण असू शकते. मानसिक तणाव जास्त असेल, तर त्याचा परिणाम मेंदूच्या सक्रियतेवरही होत असतो. त्यामुळे मेंदूला सक्रिय ठेवण्यासाठी प्राणवायूचा पुरेसा पुरवठा होण्यासाठी वारंवार जांभया येऊ लागतात. मेंदूला प्राणवायूचा पुरवठा कमी होत असेल तर याचा परिणाम फुफ्फुसांच्या कार्यावरही होतो. यादरम्यान फुफ्फुसांमध्ये प्राणवायूची मात्रा कमी होऊन कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण वाढले, तर हा वायू कमी करून प्राणवायूची पातळी वाढवण्यासाठी देखील आपल्याला जांभई येते. जांभई आल्याने मेंदूमधील प्राणवायूचा पुरवठा झपाट्याने वाढतो आणि फुफ्फुसांमध्ये साठून राहिलेला कार्बन डाय ऑक्साईड बाहेर पडण्यास मदत होते. जेव्हा शारीरिक थकवा अधिक असेल त्यावेळी शरीराला प्राणवायूचा पुरसा पुरवठा होत नसतो. अशा वेळी देखील सतत जांभया येत असतात. जांभईद्वारे शरीराला आणि स्नायूंना पुरेसा प्राणवायूचा पुरवठा होत असतो. त्यामुळे आपल्याला सातत्याने जांभया येत असल्यास शारीरिक थकवा आला असल्याचे ओळखून काही काळ विश्रांती घ्यावी.



# पाठदुखी, कंबरदुखीने हैराण? मग जमिनीवर झोपून पहा

**आजकाल** तरुण वर्गातही पाठदुखी, कंबरदुखी, मणक्याच्या वेदना, श्वास घेण्यास त्रास असे विकार वाढत चालले आहेत. सुखासीन जीवनशैली आणि व्यायामाचा अभाव ही कारणे त्यामागे आहेत तसेच रोजच्या आयुष्यात वाढलेले ताणतणाव ही त्याला हातभार लावत आहेत. आपल्या वापरत असलेल्या मऊ मुलायम गाद्या हे विकार अधिक वाढवतात असे निरीक्षण नोंदवले गेले आहे.

मऊ गाद्या, उशा सुखद वाटल्या तरी पाठीची दुखणी, स्वास्थ्यासाठी त्या चांगल्या नाहीत असे तज्ज्ञ सांगतात. मणक्याचे विकार दूर ठेवायचे असतील तर जमिनीवर सतरंजी अथवा पातळ चटई टाकून त्यावर जमिनीला पाठ लावून झोपणे खूपच उपयुक्त ठरते. अशा विश्रांतीचे अनेक फायदे होतात. पहिले म्हणजे जमिनीला पाठ लावून झोपण्याने पाठीचा कणा योग्य स्थितीत राहतो. उशी न घेता झोपले तर श्वास घेण्यास होत असलेला त्रास दूर होतो.



एखाद्या रात्री झोप येत नसेल तर अशा प्रकारे जमिनीवर झोपून पहा, शांत झोप येते.

खांदे, कुल्ले या ठिकाणी वेदना होत असतील तर जमिनीवर झोपण्याने त्या हळूहळू कमी होत जातात. पाठदुखीचा त्रास कमी होतो. गादीवर झोपल्याने शरीराचे तापमान वाढते, त्यामुळे शरीरात उष्णता वाढते. चटई अथवा सतरंजी घालून जमिनीवर झोपल्यास हा त्रास होत नाही, शिवाय रक्तप्रवाह सुरळीत राहतो आणि मेंदू शांत राहतो. स्नायूंना आराम मिळतो. रोज जमिनीवर झोपणे शक्य नसेल तर जेव्हा जेव्हा पाठदुखी, कंबरदुखी व वरील कोणते त्रास होतात तेव्हा काही दिवस तरी जमिनीवर झोपावे, असे सांगितले जाते.

**प्रसंगानुरूप मनुष्य वेगवेगळया प्रकारचे आणि आवश्यकतेनुसार तऱ्हेतऱ्हेचे वस्त्रप्रकार उपयोगात आणत असतो. त्यातलाच एक प्रकार आहे नाइटविअर. हा एक असा प्रकार आहे, जो आपले स्थान केवळ टिकवूनच नाही, तर दिवसेंदिवस अधिकाधिक 'स्टायलिश' होत आहे. ज्या नाइटविअरला आपण अधिक करून गाऊन या एकाच नावाने ओळखत, संबोधत असू तो आज कमालीच्या विविध अवतारांमध्ये दिसतो.**

# तऱ्हेतऱ्हेचे नाइटविअर



**कोणे** एकेकाळी ज्याची सुरुवात झाली असावी, केवळ सोय व आवश्यकता म्हणून. दिवसभराच्या हर तऱ्हेच्या कपड्यांचे ओझे वागवून जीव व देह दोन्हींना जरा आराम मिळावा, यासाठी सुटसुटीत असा हा झोपतानाचा पोशाख म्हणजेच नाइटविअर. हे खरे वाटत नाही ना? तेव्हा या अपेक्षांची पूर्ती करायला रोज वापरून मऊसूत झालेला, अक्षरशः अंगवळणी पडलेल्या एखाद दुसऱ्या रोजच्या ड्रेसने तेव्हा सुरुवात झाली असावी. हळूहळू याच्याकडेही लक्ष दिले जाऊ लागले असावे. त्यामुळेच याला एक विशिष्ट रूप आले. मग त्याची अनेक रूपे झाली. आज ही रूपे शमीस, नाइट ड्रेस कप्तान, गाऊन, मॅक्सी, रॅप सेट, टॉप-शॉर्ट्स सेट, बेबी डॉल अशी आहेत.



▮ शमीस हा साधारणतः सिंगल पीस असतो व लांबीला गुडघ्यांच्या थोडासा वर असतो. यातही आता टू-पीस किंवा रॅप असा आणखी एक प्रकार आला आहे. ▮ सेट म्हणजेच टी शर्ट-स्लीव्हलेस व पँट थ्री-फोर्थ असा ट्रेंड आहे. टीनएजर्ससाठी टॉप-शॉर्ट सेट विशेष करून आवडीचा होताना दिसतोय. ▮ रंग संगतीबद्दल ही आजकाल प्रत्येक जण 'चुझी' होताना दिसत आहे. नाइटविअरही त्याला अपवाद नाही. पांढरा, क्रीम, लायलॅक, पिंक, रेड, ब्लॅक हे झाले क्लासिक्स, तर नवीन रंगांमध्ये प्लम, परपल, हॉट पिंक, अ‍ॅक्वा म्हणजेच हॉट ब्ल्यू. पांढरा, गुलाबी, यलो, ब्राऊन, टरक्वॉइज या रंगांना पसंती आहे. ▮ इतकेच नव्हे तर त्याची डिझाइन, वापरलेले मटेरिअल या गोष्टींकडे ही विशेषत्वाने लक्ष दिले जाते. ब्रायडल आणि डिझायनर नाइटविअरला सुद्धा खूप मागणी आहे यातही पॅटर्नबद्दल बोलायचे झाले, तर पायघोळ, हॉल्टर नेक, योक पिस, शेपली म्हणजेच जास्त घेर नसलेला, फुल, थ्री-फोर्थ हे आहेतच. ▮ शिवाय प्रिंटबद्दल काय विचारायचे. प्लेन, टेक्सचर्ड, एम्ब्रॉयडरी, लाइट आणि ब्राइट प्रिंटेड, अ‍ॅबस्ट्रॅक्ट प्रिंटेड हे आहेचत, पण क्लासिक म्हणावे असे हलकेफुलके फ्लोरल व पोल्का डॉट्स आपले वर्चस्व टिकवून आहे. ▮ नाइटविअर म्हणजे दैनंदिन जीवनातील एक अविभाज्य घटक बनलेला आहे. त्यामुळे त्याची 'डिमांड' रंग लाई है. तो स्टायल स्टेटमेंट ठरत आहे. यातून आपण आपली निवड करावी व स्टाइल-स्टेटमेंट ठरवावे.



# कॉर्न फ्रिटर



▮ **साहित्य :** मक्याचे दाणे उकडून चेचून, उकडून किसलेला बटाटा, आवडत असल्यास किसलेले चीझ (चेडस चीझ असल्यास उत्तम), मिरपूड, ओरिगनो, बेसिल चुरडून, नसल्यास ड्राय हर्ब्स, किंचित साखर, मीठ, रेड चिली फ्लेक्स. यामध्ये आवडत असेल तर पालक किंवा गाजरही बारीक चिरून अथवा किसून घालता येईल.

▮ **कृती :** एका भांड्यात सर्व साहित्य एकत्र करावे. त्याचे चपटे गोळे करावे आणि तव्यावर छान तेलात परतून घ्यावेत. फुटत असतील तर थोडा मैदा, कॉर्नफ्लोअर, ब्रेड कुस्करून घालावा. यामुळे ते मिश्रण मिळून येईल. झाले आपले कॉर्न फ्रिटर तयार.

**केस गळत आहे, टक्कल पडतंय आणि अनेक उपाय करूनही फायदा मिळत नाहीय, तर हे तेल आपल्यासाठी उत्तम पर्याय आहे. याने टक्कल पडलेल्या जागेवरही नवे केस येतील आणि केस दाट होतील. पाहू कसं तयार करायचं हे तेल..**

# या तेलाने उगवतात नवे केस

**हे** तेल तयार करण्यासाठी आपल्याला ५ वस्तूंची गरज आहे ज्या सहजपणे उपलब्ध असतात.

▮ लसणाच्या पाकळ्या : ६ ते ७
▮ ताजा चिरलेला आवळा : २ ते t
▮ चिरलेला कांदा : १ लहान
▮ एरंडेल तेल : ३ चमचे
▮ नारळाचे तेल : ४ चमचे

या पाचही वस्तू मिसळून आपण तेल तयार करू शकता.



**कृती** - सर्वात आधी एका वाटीत नारळाचे तेल आणि एरंडेल तेल मिसळून घ्या. आता यात कापलेला लसूण, कांदा आणि आवळा टाका. हे मिश्रण मंद आचेवर ५ मिनिटे शिजवून घ्या. आता आचेवरून काढून १ तास हे मिश्रण असंच राहू घ्या. हे तेल नियमितपणे केसांना लावल्याने, केसांचे गळणे कमी होईल आणि गळलेल्या केसांमुळे डोक्यावरील त्वचा दिसायला लागली असेल तर तिथेही नवे केस येतील. याव्यतिरिक्त केसांमध्ये दाटपणा येईल. तर वेळ करू नका, तयार करा आणि या केसांना नवीन जीवन.



# लठ्ठपणा वाढण्याची सहा कारणे, हे उपाय करा!

**महिला असो किंवा पुरुष आपल्या लठ्ठपणामुळं हैराण असतात. या लठ्ठपणामागे अनेक कारणं असतात. आपलं खाणं-पिणं, राहणं यांचा सतत परिणाम आपल्या लठ्ठपणावर होतो. त्यामुळं आपल्या सौंदर्यावर तर परिणाम होतोच शिवाय आरोग्यही धोक्यात येतं.**



**दररोज काबोर्नेटेड ड्रिंक्स पिणं**

जर आपण दररोज सोडा पित असाल तर सावधान, कारण त्याच्या सेवनानं लठ्ठपणा वाढू शकतो. संशोधनकर्त्यांनुसार दररोज सोडा प्यायल्यानं लठ्ठपणा जोमानं वाढतो. तर आठवड्यात एक वेळा सोडा प्यायल्यानं प्रकृतीवर जास्त परिणाम होत नाही. खूप जणांना वाटतं की डायट सोड्यात कमी कॅलरीज असतात. मात्र या कॅलरीजसुद्धा प्रकृतीसाठी हानीकारक असतात. त्यात साखरेचं प्रमाण अधिक असतं म्हणून जेवताना सोडा पिणं टाळावं. जर तुम्हाला जेवताना काही ड्रिंग प्यायचंच असेल तर फळांचा ज्यूस प्या.

**जास्त फॅट्सयुक्त पदार्थ खाल्ल्यानं...**

लठ्ठपणासाठी सर्वात जास्त जबाबदार खाण्या-पिण्याच्या सवयी असतात. जर तुम्ही बेसुमार मिष्ठान्न, तुप, फास्टफूड खात असेल तर लठ्ठपणाला सामोरं जावं लागेल. आपल्या आहारात जास्त फॅट्सयुक्त पदार्थ नसावे, याची काळजी तुम्हालाच घ्यायचीय. कारण त्यात कॅलरीची संख्या खूप कमी असते. त्यामुळं ते टाळल्यानं शरीर स्वस्थ आणि लठ्ठपणा विहरहित राहील. जेवणार ऑलिव्ह ऑर्लचा वापर करावा.

**रात्री उशिरा जेवण करणं आणि लगेच झोपणं...**

हे खरंय की जेव्हा आपण झोपता, तेव्हा नॅचरली आपल्या शरीरातून चरबी कमी होते. मात्र पोटभर जेवून झोपल्यानं असं घडू शकत नाही. अनेक जण रात्री खूप उशिरानं जेवतात, ज्यामुळं त्यांना पोटाशी संबंधित अनेक समस्यांना सामोरं जावं लागलं. सोबतच लठ्ठपणा ही समस्याही निर्माण होते. जर तुम्ही योग्य वेळी जेवणाची सवय लावाल, तर लठ्ठपणा कमी करण्यात मदत होईल. सोबतच रात्री जेवण कमी करावं आणि फळं खावीत. याशिवाय जेवल्यानंतर लगेच झोपू नये. कारण असं केल्यानं जेवण पचत नाही. आपल्या जेवणाच्या आणि झोपण्याच्या मध्ये कमीत कमी तीन तासांचं अंतर असावं.

**जेवणासाठी मोठं ताट वापरणं...**

जेव्हा आपण घरी किंवा बाहेर जेवता तेव्हा जेवताना आपल्या ताटाच्या आकाराकडे विशेष लक्ष द्यावं. एका सर्व्हेनुसार जे लोक जेवणासाठी मोठं ताट घेतात, त्यात भरपूर पदार्थ वाढून घेतात. त्यामुळं आपल्या शरीराच्या गरजेपेक्षा जास्त जेवण जेवल्या जातं. जर तुम्हाला लठ्ठपणा कमी करायचा असेल तर नेहमी छोट्या प्लेटमध्येच जेवा. यामुळे तुम्ही तुमची ओव्हर इटिंगची सवय बंद करू शकाल.

**क्रोध आणि तणावात असताना अधिक जेवणं करणं...**

आपण नेहमी बघितलं असेल की जेव्हा आपल्या खूप क्रोध येतो किंवा आपण तणावात असाल तर तुम्ही जास्त जेवू लागता. त्यावेळी जेवण चांगलं तर लागत नाही मात्र मनाला शांत करण्यासाठी आणि आणखी काही विचार करण्यासाठी तुम्ही खूप जेवता. त्यामुळं हळूहळू चरबी जमा होत जाते. क्रोध आणि तणाव असताना जास्त जेवण करणं टाळायचं असेल तर पाणी प्या. मित्रांसोबत गप्पा मारा आणि आराम करा. त्याशिवाय इतर कोणत्याही ॲक्टिव्हिटी आपण करू शकता. ज्यामुळं तुम्ही भावूक असताना एक्स्ट्रा कॅलरीज घेण्यापासून वाचू शकता.

# व्हॉट्सॲपचे हे फीचर माहितेय का? कोणत्याही भाषेत पाठवता येतो मेसेज, पाहा ट्रिक्स

**आजकाल** सगळेच नातेवाईकांशी किंवा मित्रांशी मेसेजवर बोलण्यासाठी व्हॉट्सॲपचा वापरतात. जर तुम्हीही व्हॉट्सॲप युजर असाल तर ही माहिती तुमच्यासाठी खूप महत्त्वाची आहे. मेटा-मालकीचे इन्स्टंट मेसेजिंग ॲप व्हॉट्सॲप आपल्या युजर्सना बिल्ट-इन ट्रान्सलेशन फीचर ऑफर करत आहे. या फीचरच्या मदतीने तुम्ही तुमचा मेसेज समोरच्या व्यक्तीपर्यंत कोणत्याही भाषेत पोहोचवू शकता. म्हणजेच जर तुम्हाला हिंदी भाषा येत असेल. परंतु तुम्हाला इंग्रजी किंवा इतर कोणतीही भाषा जाणणाऱ्या तुमच्या मित्राशी किंवा ऑफिसमधील सहकाऱ्याशी बोलायचे असेल तर तुम्ही ते सहज करू शकता. भाषांतर फीचर वापरण्यासाठी पाहा ही स्टेप बाय स्टेप प्रोसेस.



भाषांतर फीचर वापरण्यासाठी तुम्हाला ही प्रोसेस फॉलो करावी लागेल. तुमचे व्हॉट्सॲप चॅट उघडा आणि एक नवीन मेसेज टाइप करा. आता हा टाईप केलेला मेसेज मेनू येतपर्यंत होल्ड करून ठेवा. आता मेनूमधील 'अधिक' पर्याय निवडा. आता भाषांतर पर्याय निवडा. आता तुमच्या समोर एक पॉप-अप विंडो उघडेल ज्यामध्ये तुम्हाला भाषांतरित मेसेज दिसेल. जर तुम्ही पाठवू इच्छित असलेल्या भाषेत मेसेजेसचे भाषांतर केले नसेल, तर युजर्स त्यांना ज्या भाषेत संदेश पाठवायचा आहे ते निवडू शकतात. तसेच व्हॉट्सॲपने एक नवीन फीचर रोल आउट करण्यास सुरुवात केली आहे. या नवीन फीचरच्या मदतीने युजर्स स्टेटस अपडेट्समध्ये व्हॉइस नोट्सही शेअर करू शकतील. व्हॉईस स्टेटस अपडेट फीचरची माहिती WA BetaInfo या प्लॅटफॉर्मद्वारे देण्यात आली आहे, जी व्हॉट्सॲप वर येणाऱ्या नवीन फीचर्सचा ट्रॅक ठेवते. WA BetaInfo ने ट्विट करून व्हॉट्सॲपमधील या नवीन फीचरचा स्क्रीनशॉटही शेअर केला आहे. WA BetaInfo नुसार, कंपनी सध्या काही बीटा युजर्ससाठी हे फीचर आणत आहे.

